ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख ९ सप्टेंबर, १९५३ | अंक ३६

## विविध माहिती

**भारतांत सीलोनचे विद्यार्थी**—पदवीनंतरचा पाली भाषेचा अभ्यासक्रम पुरा करण्यासाठी सीलोनमधून सहा विद्यार्थी नलंद येथें आले आहेत. सीलोनमधून भारतांत शिक्षणासाठीं येणाऱ्या विद्यार्थ्यांचा हा पहिला गट आहे. नलंद येथें परदेशीय विद्यार्थ्यांना रहाण्यासाठीं जें वसतिगृह बांधण्यांत आलें आहे, त्यांत त्यांची सोय करण्यांत आली आहे.

**पाकिस्तानमधील कागदाचा कारखाना**—पाकिस्तानमध्यें करणफुली येथें कागदाचा एक कारखाना उभारण्यांत येत असून येत्या ऑक्टोबरपासून त्यांत प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होईल. ह्या कारखान्यामुळें पाकिस्तानची कागदाची बहुतेक गरज भागेल. कारखान्याला ४,५०,००,००० रुपये भांडवल लागलें. त्यांत दरवर्षी निरनिराळ्या प्रकारचा ३०,००० टन कागद तयार होईल.

**आसाममध्यें कामगारांसाठीं घरें**—आसाममधील चहाच्या मळ्यांत व इतर कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांसाठीं गेल्या तीन वर्षांत १४,६४५ पक्कीं, ४२,७७४ अर्धवट पक्कीं आणि १,३६,७३८ कच्चीं घरें बांधण्यांत आलीं. ह्या कामासाठीं भारतीय सरकारनें राज्य-सरकारला १०,००,०००=रुपये मंजूर केले होते. त्यापैकीं ५५,००० रुपये राज्य सरकारनें निरनिराळ्या कारखान्यांना बेताच्या व्याजाच्या दरानें कर्जाऊ दिले आहेत.

**कैरोमध्यें भारतीय संगीताची मैफल**—इंडो-अिजिप्शिअन फौंडेशन ह्या संस्थेतर्फें कैरो येथें भारतीय संगीताचा व नृत्याचा एक कार्यक्रम नुकताच करण्यांत आला. ह्या प्रसंगीं कैरोंतील परदेशीय प्रतिनिधी हजर होते. श्री. दिलीप कुमार रॉय ह्यांनी बंगाली व हिंदी गाणीं म्हणून दाखविलीं आणि त्यांची शिष्या कु. इंदिरा देवी ह्यांनीं नृत्याचा कार्यक्रम केला.

**उत्तर-प्रदेशांतील ट्यूब विहिरी**—उत्तर-प्रदेशांतील ट्यूब विहिरी खणण्यासाठीं मागविलेली यंत्रसामुग्री मुंबई बंदरांत येऊन पोहोचली आहे. तिचें वजन २०० टन आहे. आग्र्याजवळ माणिपुरी येथें ही यंत्रसामुग्री जुळविण्यांत येणार आहे. ह्यापूर्वी प. जर्मनीहून आणखी कांहीं यंत्रसामुग्री माणिपुरी येथें आणण्यांत आली आहे.

**त्रिमिति चित्रपट मागें पडूं लागले**—अमेरिकेंत त्रिमिति चित्रपटांचा प्रेक्षकांना कंटाळा आला असल्याचें निदर्शनास आलें आहे. आपल्या अंगावर पडद्यांतून कांहींतरी वस्तू येत आहे अशा प्रकारच्या आभासाची नवलाई आतां संपली असून प्रेक्षकांना आतां पहिल्यासारखेच बोलपट आवडूं लागले आहेत. सध्यां अमेरिकेंत २७ नवीन बोलपट घेण्यांत येत आहेत. त्यांपैकी अवघे २ त्रिमितिपट आहेत.

**सीलोनची मोनाझाइटची विक्री**—सीलोननें लंडनमधील एका कंपनीला ३० टन मोनाझाइटची वाळू विकल्याचें समजतें. ही वाळू कोलंबोच्या दक्षिणेस सीलोनच्या प. किनाऱ्यावर पावसाळ्यांत मोठ्या प्रमाणावर जमते. सरकारनें वाळू विकण्याचा धंदा नुकताच सुरू केला आहे. सध्या सरकारजवळ १० टन वाळू आहे. दर टनाला १,५०० रुपये भाव कंपनीनें दिला.

**द. आफ्रिकेला जागतिक बँकेचें कर्ज**—द. आफ्रिकन सरकारनें जागतिक बँकेशीं दोन करार करून ६ कोटी डॉलर्सचें कर्ज मिळविलें आहे, अशी माहिती सरकारचे फडणीस मि. हॅवेंगा ह्यांनीं जाहीर केली आहे.

**पाकिस्तानांतील तांत्रिक शिक्षणाच्या शाळा**—पाकिस्तानमधील तांत्रिक शिक्षणाच्या शाळांना व कॉलेजांना लागणारें साहित्य ऑस्ट्रेलिआ पुरविणार आहे. ह्या साहित्याची किंमत १,२०,००० ऑस्ट्रेलिअन पौंड भरेल. पाकिस्तानचें सरकार पूर्व व पश्चिम पाकिस्तानांत मिळून ८ तांत्रिक शिक्षणाच्या शाळा उघडण्याचा विचार करीत आहे.

**मि. जिना ह्यांच्यासंबंधीं पुस्तक**—मि. हेक्टर बोलिथो ह्या सुप्रसिद्ध ब्रिटिश लेखकानें मरहूम मि. जिना ह्यांच्यासंबंधींचें पुस्तक लिहून पुरें केलें आहे, असें समजतें. मि. बोलिथो ह्यांनीं ह्या कामासाठीं पाकिस्तानला दोनदां भेटी दिल्या होत्या आणि ५ महिनेपर्यंत ते आपल्या चरित्रनायकाविषयीं माहिती गोळा करीत होते.

**देवदारापासून तेल**—हिमाचल प्रदेशांतीलें एका संशोधनकेंद्रांत देवदार वृक्षाच्या सालीपासून तेल काढण्यांत आलें आहे. ह्या तेलांत आणखी सुधारणा करण्यांत येत आहे. साबण करण्याच्या कामीं तेलाचा उपयोग होण्यासारखा असल्यामुळें तें बऱ्याच साबणाच्या कारखानदारांकडे प्रयोगादाखल पाठविण्यांत आलें आहे.

**शिरपूर येथील कारखाना**—शिरपूर पेपर मिल्स आणि सिरसिल्क रेयॉन फॅक्टरी ह्या कारखान्यांची मॅनेजिंग एजन्सी अद्याप बिर्ला ब्रदर्सकडे गेलेली नाहीं असें समजतें. बिर्ला ब्रदर्सकडून २५ लाख रुपये घेतल्यावरच एजन्सीचा बदला करण्यांत येणार आहे. बिर्ला ब्रदर्स ह्यांनीं हैद्राबादच्या सरकारला एकूण एक कोट रुपये ठराविक मुदतींत द्यावयाचे आहेत.

**भारतीय विद्यापीठांत नेपाळी विद्यार्थी**—भारतीय सरकारनें नेपाळी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन निरनिराळ्या राज्यांतील विद्यापीठांतून खास शिक्षण घेण्यासाठीं पाठविण्याचें ठरविलें आहे. उत्तर प्रदेशांतील लखनौ व आग्रा येथील मेडिकल कॉलेजांत ४ नेपाळी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत यावा, अशी शिफारस करण्यांत आली आहे.

### मयुराक्षी धरणाची यंत्रसामुग्री

प. बंगाल सरकारच्या अर्थ-खात्याचे खास अधिकारी श्री. बसू आणि इलेक्ट्रिकल एंजिनिअर श्री. चौधरी असे दोन अधिकारी नुकतेच कॅनडाचा दौरा करून परत आले आहेत. कोलंबो योजनेप्रमाणें मयुराक्षी धरणासाठी भारताला कॅनडाकडून १ कोटी रुपयांची यंत्रसामुग्री मिळणार आहे. ती यंत्रसामुग्री पाहून भारतांत आणण्याची व्यवस्था करण्यासाठी ते कॅनडांत गेले होते. हे अधिकारी कॅनडांत ४ महिने राहिले होते. ह्या कालांत त्यांनीं अनेक संबंधित कारखान्यांना भेटी दिल्या, कशा प्रकारचें साहित्य पाहिजे ह्याची त्यांना कल्पना दिली आणि कराराच्या शर्तीहि ठरविल्या. नायगारा धबधब्यावर बसविण्यांत आलेली जलविद्युत्निर्मितीची यंत्रसामुग्री आणि टेनेसी व्हॅली ॲथॉरिटी येथें बसविण्यांत आलेली यंत्रसामुग्री त्यांनीं नजरेखाली घातली आहे. मयुराक्षी योजनेंत मसनजोर येथें एक धरण बांधण्यांत येणार असून त्याच ठिकाणीं वीज निर्माण करण्यांत येणार आहे. ह्या वीजनिर्मिति-केंद्रासाठी लागणारी टर्बाइन्स, जनरेटर्स व ट्रॅन्सफॉर्मर्स इत्यादि सामुग्री कॅनडाकडून घेण्यांत येणार आहे. ह्या मालासाठी जगांत सध्या ज्या किंमती घेण्यांत येतात त्यापेक्षाहि कमी किंमती भारताला द्याव्या लागणार आहेत असें समजतें. सुमारें १८ महिन्यांच्या अवधींत सर्व यंत्रसाहित्य कलकत्ता बंदरांत येऊन पोचेल. कराराप्रमाणें वरील यंत्रसामुग्री उभारण्याचें काम ती पुरविणाऱ्या कारखानदारांच्या एंजिनिअर्सनीं करावयाचें आहे. राज्य-सरकाराचे एंजिनिअर्स ह्या कामावर देखरेख ठेवणार आहेत.

### मॅसी-हॅरिस फर्ग्युसन लि.

शेतीसाठी लागणारी यंत्रसामुग्री मोठ्या प्रमाणावर बनविणाऱ्या जगांतील दोन मोठ्या कंपन्यांचें एकत्रीकरण होणार आहे. हॅरी फर्ग्युसन ट्रॅक्टर कंपनी ही ब्रिटिश कंपनी व मॅसी-हॅरिस लिमिटेड ही कनेडियन कंपनी, ह्या त्या कंपन्या होत. ग्रेट ब्रिटन, कॅनडा, युनायटेड स्टेट्स, फ्रान्स, जर्मनी व द. आफ्रिका येथील त्यांचे कारखाने आतां एका नियंत्रणाखाली येतील व नवी संस्था मॅसी-हॅरिस-फर्ग्युसन लि. ह्या नांवानें ओळखली जाईल. जुन्या दोन्ही कंपन्यांच्या एकत्रीकरणामुळें, त्यांच्या उत्पादनाच्या वाढीस व निर्गतीस चांगली चालना मिळणार आहे. फर्ग्युसन डिझाइनच्या ट्रॅक्टर्सवर फर्ग्युसन हेंच नांव कायम राहील. व्यवस्था व धोरण-विषयक जबाबदारी सध्याच्या मॅसी-हॅरिस लि. च्या अध्यक्षाकडे म्हणजे मि. जेम्स डंकन ह्यांचेकडे असेल व ते नव्या संघटनेचे अध्यक्ष होतील. मि. हॅरि फर्ग्युसन हे बोर्डाचे चेअरमन म्हणून काम करतील व नव्या कंपनीच्या उत्पादनाचें तांत्रिक काम ते संभाळतील. फर्ग्युसन कंपन्यांचे सर्व शेअर्स मॅसी-हॅरिस कंपनीकडे वर्ग करण्यांत येतील व त्यांचे बदली मॅसी-हॅरिसचे १०,९५,०५५ शेअर्स देण्यांत येतील.

**साबणाची प्राचीनता**—साबण ही वस्तु जगांत फार प्राचीन काळापासून तयार होत असे. २,००० वर्षांपूर्वी रोमन लोक साबण वापरीत असत. पण साबणाचा शोध त्याहिपूर्वी लागला होता. टायबर नदीच्या कांठीं सॅपो हिल ह्या ठिकाणीं रोमन लोक धुणें धूत असत. त्यांवरून साबणाला त्याचें नांव मिळालें.

**पांढऱ्या मुंग्यांची शक्ति**—वॉशिंग्टन येथील जीवनशास्त्रज्ञांनीं असा शोध लावला आहे कीं, कांहीं प्रकारच्या पांढऱ्या मुंग्या शिशाला भोंक पाडूं शकतात, आर्सेनिकवर जगूं शकतात आणि सर्व झाडच्या झाड नाहींसें करूं शकतात.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

**[ शेड्यूल्ड बँक ]**

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४९,९२५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७८,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|---|
| रु. १-८-० | रु. १-१२-० | रु. २-०-० | रु. २-८-० |

दहा अगर अधिक वर्षे रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन

दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ | कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ | कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ | कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ | लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोयंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| वैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ९ सप्टेंबर १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आजची बेकारी, तिचें मूलभूत स्वरूप व त्यांवर उपाययोजना

बेकारीचा प्रश्न गेले कांहीं महिने प्रामुख्यानें पुढें आला आहे व या प्रश्नाची गंभीरपणें चर्चा ऑल इंडिया काँग्रेस कमिटी, नियोजन मंडळ, प्रमुख कारखानदार, व्यापारी संघटना, इत्यादि कडून केली जात आहे. या चर्चेमध्यें एक गोष्ट स्पष्टपणें दिसून येतें ती ही कीं, सध्यां सुशिक्षितांमधील बेकारीकडेच प्रामुख्यानें लक्ष दिलें जात आहे; कारण एम्प्लॉयमेंट एक्सचेंजच्या आंकड्या-प्रमाणें नोंदविल्या गेलेल्या बेकारांची संख्या साडेचार लाखांवर गेली आहे. परंतु हा साडेचार लाखांचा आंकडाहि पूर्णपणें बरोबर नसावा; कारण कांहीं सुशिक्षित लोक आपलीं नांवें एम्प्लॉयमेंट एक्सचेंजमध्यें नोंदवीत नाहींत. विशेषतः शिक्षकवर्गांत अशी परिस्थिति फार आढळते. तेव्हां प्रत्यक्ष बेकारांची संख्या साडेचार लक्षांवर असली पाहिजे. कांहीं दिवसांपूर्वी बंगलोर येथें भाषण करतांना माजी अर्थमंत्री डॉ. जॉन मथाई यांनीं सुशिक्षितांमधील बेकारीचें उच्चाटन केलें नाहीं तर मोठा अनर्थ ओढवेल, असा गंभीर इषारा दिला. नियोजन मंडळानें १ ऑगस्टला एक अकरा कलमी योजना जाहीर केली आहे, परंतु ही योजना त्वरित फलदायी नाहीं. कारण, मंडळानें सुचविल्याप्रमाणें आपुलकीनें नवीन कामें सुरू झालीं पाहिजेत, व कांहीं ठिकाणीं कामें सुरू करावयास पैशाचीहि अडचण भासणार. हिंद सरकारच्या मजूर मंत्र्यांनीं, कोणाहि कारखानदारानें कोणाहि कामगाराला सध्यांच्या परिस्थितींत कामावरून दूर करूं नये, अशी सूचना केली आहे. कारखानदारांच्या आर्थिक अडचणीमुळें बेकारी उद्भवते. माल पडून राहिला किंवा मालाला खप नसला म्हणजे उत्पादन कमी करावें लागून कामगारांना कामावरून कमी करावें लागतें. सरकारनें नियंत्रणें रद्द केल्यामुळेंहि बेकारींत भर पडली आहे. समाजाच्या आर्थिक व्यवहाराच्या अडचणी बेकारी व मंदी यांच्या रूपानें जाणवूं लागतात.

वास्तविक पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम सुरू होऊन दोन वर्षें, तीन महिने झाले आहेत. तेव्हां देशांतील उत्पादनशक्तीला जोरदार चालना मिळाली पाहिजे. नियोजन मंडळाच्या मताप्रमाणेंहि दर वर्षी १८ लक्ष लोकांना नवीन कामें मिळालीं पाहिजेत. परंतु प्रत्यक्ष अनुभव मात्र समाधानकारक येत नाहीं. लोकांच्या क्रयशक्तींत झालेली घट, योग्य त्या प्रमाणांत नवीन भांडवल गुंतवणुकीचा अभाव आणि परराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतींत जागतिक स्पर्धा, यांमुळें आजची बेकारी निर्माण झाली आहे. बँकांजवळचा पैसा उत्पादनाच्या दृष्टीनें योग्य रीतीनें गुंतविला जात नाहीं. उत्पादन, वाहातूक व परराष्ट्रीय व्यापार यांना जोरदार चालना मिळाल्याशिवाय आजचा बेकारीचा प्रश्न मामुली उपायांनीं सुटणार नाहीं.

परंतु आपल्या देशांत प्रच्छन्न बेकारी फारच मोठ्या स्वरूपांत अनेक वर्षें आहे व तिची दाद कोणींच घेत नाहीं. हिंदच्या ५॥ लक्ष खेडेगांवांतून शेतकरी वर्गाला वर्षांतून निदान १०० ते १२० दिवस तरी रिकामें राहावें लागतें, व ज्या वेळीं काम असतें त्या वेळींहि त्यांना पुरेसें काम नसतें. म्हणजे शेतकरीवर्ग कांहीं दिवस रिकामा असून बाकीच्या कांहीं दिवसांत त्याला भरपूर काम मिळत नाहीं. आज शेतीच्या व्यवसायावर ७० टक्के जनता अवलंबून आहे व शेतीच्या धंद्यांतील ही गर्दी कमी करून शेतीवर अवलंबून असणारांचें प्रमाण ५० टक्क्यांवर आणलें पाहिजे, असें तज्ज्ञांचें मत आहे. याप्रमाणें ग्रामीण विभागांत बेकार राहावें लागणारांची व अपुरें काम मिळणारांची संख्या प्रत्यक्ष दोन कोटी किंवा त्याहूनहि जास्त असली पाहिजे. ही बेकारी दूर करावयाची तर सर विश्वेश्वरअय्या म्हणतात त्याप्रमाणें खेडेगावांतून विजेच्या शक्तीनें चालणारे अनेक बैठे उद्योगधंदे सुरू केले पाहिजेत. याशिवाय शेतीच्या दृष्टीनें पडीत जमिनी लागवडीस आणून कांहीं लोकांना काम मिळवून दिलें पाहिजे. पाणीपुरवठा करून भाजीपाला व फळें यांचें उत्पादन वाढवितां येण्यासारखें आहे.

मच्छीमारीचें उत्पादन वाढवून पुष्कळांना काम मिळूं शकेल. खेडेगांवांतील प्रच्छन्न बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठी वरील प्रकारांनीं उत्पादन वाढवून त्याचबरोबर वाहातुकीसाठी रस्ते बांधले पाहिजेत, यामुळें व्यापाराला चालना मिळेल व वाहातूक-बँकिंग–विमा–व्यापार या स्वरूपाचे व्यवसाय हळूहळू वाढूं शकतील व त्यामुळें नवीन रोजगारी निर्माण होईल व त्याचबरोबर समाजांतील संपत्तीचें उत्पादनहि वाढूं शकेल. आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें कोणत्याहि समाजांत व्यापार–वाहातूक–विमा–बँकिंग या स्वरूपाचेच व्यवहार वाढणें फार आवश्यक असतें असें कोलिन क्लार्क सारख्या प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांचें मत आहे. आपल्या देशांत बँका व विमा हे व्यवसाय बहुतेक लहान–मोठ्या शहरांतूनच पसरलेले आहेत. गेल्या कांहीं वर्षांत शेती मालाचे बाजारभाव वाढल्यामुळें खेडेगांवांतील शेतकरीवर्गाच्या हातांत जास्त पैसा आला असल्यामुळें विमापत्रकें योग्य प्रयत्नांनीं खेडेगांवांतून खपूं शकतील असा अंदाज आहे. नियोजन मंडळानें सहकारी शेतीवर विशेष भर दिला आहे. विजेचें उत्पादन निरनिराळ्या धरण–योजनांची एक बाजू म्हणून शक्य झालें म्हणजे, खेडेगांवांतून बैठ्या उद्योगधंद्यांचें उत्पादन वाढूं शकेल. मोटारींचे रस्ते अगदींच अपुरे आहेत अशी अनेकांची रास्त तक्रार आहे. रस्त्यांचें बांधकाम, प्राथमिक शाळांच्या इमारतींचें बांधकाम, इतर सरकारी लोकोपयोगी इमारतींचें बांधकाम, इत्यादिमुळें नवीन रोजगारी निर्माण होइल. या सर्व विवेचनावरून हें लक्षांत येईल कीं, आज जरी उद्योगधंद्यांतील मंदीमुळें सुशिक्षितांच्या बेकारीचा प्रश्न निर्माण झाला असला तरी आपल्या देशाच्या ग्रामीण जीवनांत प्रच्छन्न बेकारी व अपुरी रोजगारी या दोन गोष्टी गेलीं कित्येक वर्षें आहेत, व याचें मुख्य कारण अपुरें उत्पादन, अपुरी वाहतूक, अपुरा व्यापार या गोष्टींमध्यें आहे. तेव्हां सर्व प्रकारच्या बेकारीचा प्रश्न कायमचा सोडवावयाचा तर उत्पादनाची व वाहातूक–व्यापार यांची सर्वांगीण प्रगति साधली पाहिजे.

## भारतीय मालाला सीलोनची बाजारपेठ

उत्तर प्रदेश सरकारच्या ग्रामोद्योग खात्याचा अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यांत आला आहे. ह्या अहवालावरून ग्रामोद्योगाच्या व इतर प्रकारच्या मालाला परदेशांत कितपत वाव आहे तें लक्षांत येतें. उदाहरणार्थ, सीलोनमध्यें लोखंडाचें व पोलादाचें फर्निचर बहुतेक इंग्लंडकडून आयात केलें जातें. सुबकपणा आणि किंमत ह्या दोन बाबतींत दक्षता बाळगली तर भारतहि फर्निचरची बाजारपेठ थोडीबहुत मिळवूं शकेल. सीलोनमध्ये विजेचे पंखे तयार होत नसल्यामुळें त्या देशाची सर्व गरज पंखे आयात करूनच भागवावी लागते. भारतांत ए. सी. टाइपचे जे विजेचे पंखे तयार होतात ते सीलोनमध्यें खपूं शकतील. परंतु पुरेशा प्रचाराच्या अभावीं भारतीय कारखानदारांना बाजारपेठेचा उपयोग करून घेतां आलेला नाहीं. भारत सीलोनच्या बाजारपेठेंत खपवूं शकेल असा आणखी कितीतरी माल आहे. बिस्किटें, एनॅमेलच्या वस्तू, अल्युमिनमच्या वस्तू, शेतीचीं अवजारें, छत्र्या, चहाचीं खोकीं, पंपाचीं यंत्रें, शिवण्याचीं यंत्रें, इत्यादि मालाला सीलोनमध्यें चांगली मागणी आहे. सध्या अशा प्रकारचा माल सीलोनला पुरविण्यांत भारताचा अनुक्रम अगदी खालचा आहे. प्रचार आणि विक्रेत्यांच्या त्या देशाला भेटी, ह्या दोन साधनांनीं भारताला आपली निर्यात पुष्कळ वाढवितां येईल. न्यूझीलंडमध्यें पायतणांची किती जरूर लागते तेंहि अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे. न्यूझीलंडची लोकसंख्या २०,००,००० आहे. देशांतील लोकांना दरवर्षी ४० लाख बुटाच्या जोड्या लागतात आणि ४० लाख जोड्या सँडल्स व इतर प्रकारच्या पायतणांच्या लागतात. खुद्द न्यूझीलंडमध्यें बुटांचे कारखाने चांगले विकास पावलेले आहेत. तरीसुद्धा मुलांना लागणारे बूट, कॅनव्हसचे बूट व गम बूट ह्या प्रकारांचा तुटवडाच भासतो. त्याशिवाय नाना प्रकारच्या कमावलेल्या कातड्यांची तेथील कारखान्यांना नेहमीच गरज लागते.

---

## जपान आयात कमी करणार

जपानमध्यें मालाच्या किंमती चढ्या राहिल्यामुळें सरकारनें आपलें अंतर्गत आर्थिक धोरण बदलण्याचें ठरविलें आहे. ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या सहामाहींत आयातींत बरीच कपात करण्यांत येणार आहे. जुगारीच्या स्वरूपाचे आर्थिक व्यवहार नाहींसे करणें आणि किंमती खालीं आणणें असे दोन हेतू आयात कमी करण्यामागें आहेत. गेल्या सहा महिन्यांत जपानमध्यें कापसाची आयात फार मोठ्या प्रमाणावर झाली; ती इतकी कीं सर्व गुदामें भरून गेलीं. त्याच बरोबर रोज लागणाऱ्या वस्तूंच्या किंमतीहि झपाट्यानें वाढल्या. जपानला आपल्या आयातीमुळेंच केवळ चिंता उत्पन्न झाली आहे, असें नव्हे. निर्यातीच्या व्यापाराबद्दलहि चिंता उत्पन्न झाली आहे. डॉलर्सच्या गटांतील राष्ट्रांशीं जपानचा जो व्यापार होतो त्याचें प्रमाण कमी–अधिक होत असलें तरी एकंदरीनें निर्यात कमी होण्याकडे कल दिसून येऊं लागला आहे. पौंडाच्या गटांतील राष्ट्रांकडे होणाऱ्या निर्यातींत तर निश्चितच घट झाली आहे. हॉंगकॉंगशीं चालणारा व्यापार विशेष थंडावला आहे. सिंगापूर, द. आफ्रिका व ब्रह्मदेश ह्यांच्याशीं चालणाऱ्या व्यापारांतहि उतरती कळा दिसून येते. अवजड यंत्रसामुग्री, लोखंड व पोलादाचें सामान व बिन–लोखंडाच्या वस्तू ह्यांची निर्यात कमी झाली आहे. उलटपक्षीं कच्चें रेशीम, शेतीचा माल, अन्न पदार्थ, ह्यांच्या निर्यातींत थोडी वाढ झाल्याचें दिसून येतें. निर्यातीच्या व्यापारांत झालेली घट लक्षांत घेऊनच आयात कमी करण्याचें धोरण जपानच्या आंतरराष्ट्रीय व्यापार व उद्योगधंद्याच्या खात्यातर्फें आखण्यांत आलें आहे.

SAVE to help yourself and the NATION
WITH THE
HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum

---

## भारतांत चालू असलेलीं नाणीं

| नाणें | वजन (ग्रेन) | धातूंचें प्रमाण |
|---|---|---|
| चांदीची पावली | ४५ | हजारी ९१६·० चांदी |
| ,, चवली | २२·५ | ,, |
| मिश्र रुपया | १८० | ५०% चांदी |
| ,, अधेली | ९० | ,, |
| ,, पावली | ४५ | ,, |
| निकेल रुपया | १८० | १००% निकेल |
| ,, अधेली | ९० | ,, |
| ,, पावली | ४५ | ,, |
| तांबें-निकेल पावली | १०५ | ७५% तांबें, २५% निकेल |
| ,, चवली | ९० | ,, |
| ,, चवली (५ वा जॉर्ज) | ९० | ,, |
| ,, आणेली | ६० | ,, |
| ,, अर्धा आणा | ४५ | ,, |
| निकेल-ब्रास चवली | ९० | ७९% तांबें १% निकेल २०% जस्त |
| ,, आणेली | ६० | ,, |
| ,, अर्धा आणा | ४५ | ,, |
| तांबें पैसा | १०० | १००% तांबें |
| ,, अर्धा पैसा | ५० | ,, |
| ,, पै | ३३·३ | ,, |
| ब्रॉंझ पैसा | ७५ | ९७% तांबें, २½% जस्त ½% टिन |
| ,, ,, | ३० | ,, |
| ,, ,, | ६० | ,, |
| ,, ,, | ४५ | ,, |
| ,, अर्धा पैसा | ३७·५ | ,, |
| ,, पै | २५ | ,, |

---

**भारतासंबंधीं अनुबोधपट**—भारतासंबंधीं अनुबोधपट तयार करण्यासाठी संयुक्त–राष्ट्र–संघटनेच्या सिनेतंत्रज्ञांचें एक मंडळ येत्या ऑक्टोबर महिन्यांत भारताला येणार आहे. ह्या वार्तापटांत शेती–संघटनेच्या भारतामधील कार्याला बरीच जागा देण्यांत येणार आहे. उत्तर–प्रदेशांतील तराई भागांत पडीक जमीन लागवडीला आणण्याचें जें कार्य चालू आहे त्याचें आणि राज्यांतील १६,००० एकराच्या सरकारी मालकीच्या शेतीचें चित्रण करण्यांत येईल.

## आंतरराष्ट्रीय साखर करार

लंडन येथें ५१ राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं एकत्र जमून साखरेसंबंधी एका करारावर सह्या केल्या आहेत. ज्या राष्ट्रांना साखर आयात करावयाची आहे आणि ज्यांना ती निर्यात करावयाची आहे अशा दोन्ही राष्ट्रांना हा व्यवहार योग्य व स्थिर किंमतींत करतां यावा म्हणून हा करार करण्यांत आला आहे. कराराची मुदत पांच वर्षांची असून त्यामधील अटींप्रमाणें एक इंटरनॅशनल शुगर कौन्सिल स्थापन करण्यांत आलें आहे. कौन्सिलवर आयात करणाऱ्या व निर्यात करणाऱ्या राष्ट्रांचे प्रतिनिधी आहेत. त्याचप्रमाणें, अशा राष्ट्रांत उत्पन्न होणारे तंटे सोडविण्याचा अधिकारहि कौन्सिलला आहे. जगांतील साखरेचा खप वाढविण्याचाहि एक उद्देश करारांत आहे. आयात करणाऱ्या देशांना साखरेची टंचाई पडूं नये आणि त्यासाठीं चढ्या किंमती द्याव्या लागूं नयेत म्हणून निर्यात करणाऱ्या देशांवर साखर पुरविण्याचें बंधन घालण्यांत आलें आहे. त्याचबरोबर किंमती फारच घसरणार नाहींत अशी हमी निर्यात करणाऱ्या देशांना देण्यांत आली आहे. साखरेचा व्यापार खुला करण्यांत आला असून किंमतीवर नियंत्रणें ठेवूं नयेत असें ठरलें आहे. निर्यात करणाऱ्या देशांनीं निर्यात वाढविण्यासाठीं आर्थिक मदत देण्याचें ठरविलें तर खुल्या बाजारांत योग्य व स्थिर किंमती राहाणार नाहींत ही गोष्ट कबूल करण्यांत आली असून, ज्या राष्ट्राचें सरकार अशी मदत देईल त्यानें मदतीचें स्वरूप कौन्सिलला कळविलें पाहिजे असें ठरविण्यांत आलें आहे. करारावर सही करणाऱ्या एकाद्या राष्ट्राला असें वाटलें कीं आर्थिक मदतीमुळें आपलें नुकसान होत आहे, तर जें राष्ट्र अशी मदत देत असेल त्याला मदत कमी करण्याची सूचना कौन्सिल देऊं शकेल. ग्राहकांना साखर सहज मिळावी म्हणून साखरेवरील नियंत्रण अगर कर कमी करण्याचें ठरलें आहे. जगांत साखरेचे साठे फार वाढल्यामुळें व किंमती घसरल्यामुळें अशा प्रकारचा जागतिक करार घडवून आणणें जरूरीचें झालें होतें. ह्या विषयासंबंधीं संयुक्त–राष्ट्र–संघटनेच्या शेती व अन्न संघटनेनें असें मत व्यक्त केलें आहे, कीं प्राथमिक स्वरूपाच्या मालाच्या बाजारपेठा अनियंत्रित ठेवल्यामुळें किंमतींत चढउतार अतिशय होतात आणि त्यामुळें अखेर उत्पादकांचें आणि ग्राहकांचें नुकसान होतें असा अनुभव आहे. १९५२–५३ सालअखेर जगांतील साखरेचा सांठा १·२२७ कोटी टन होता. त्याच्या पूर्वीच्या दोन वर्षांत तो अनुक्रमें ·९७४ कोटी टन आणि ·७७९ कोटी टन होता. त्याचप्रमाणें किंमतींतहि खूप चढउतार झालेले दिसून येतात. १९५१ सालीं क्यूबांतील साखरेची किंमत दर पौंडाला ४·७ सेंट होती. १९५३ सालीं ती ३·५७ सेंट अशी आहे. तथापि, भारताला ह्या कराराशीं फारसें कर्तव्य नाहीं. कारण, भारतातर्फे आज होणारी आयात नैमित्तिक स्वरूपाची आहे. आयातीची अशी गरज भारताला नेहमीं लागणें असंभवनीय आहे. खुद्द भारतांत देशाला लागणारी सर्व साखर देशी कारखाने उत्पादन करूं शकतात.

---

भोपाळ राज्यांत मोठें सहकारी शेत—भोपाळ राज्यांत सुलतानपूर येथें १०,००० एकर विस्ताराचें एक सहकारी शेत सुरू करण्यांत येणार आहे. शेतीसाठीं आधुनिक अवजारें भारतीय सरकार पुरविणार असून एकूण १,००० मजूर शेतावर काम करतील. मजुरांची एक सहकारी संस्था स्थापन करण्यांत येणार असून १० वर्षांनीं शेती संस्थेच्या मालकीची होणार आहे. राज्यांतील बेकारी कमी करण्यासाठीं ही शेती सुरू करण्यांत येत आहे.

## व्यापार–उद्योगधंदे विषयक वाङ्मय

संपादक, "अर्थ" यांस न. वि. वि.

श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्या सत्काराचें वर्णन नुकतेंच वाचण्यांत आलें. लक्ष्मणराव किर्लोस्करांचे येथें मी कारखाना पहावयास १९१२ सालीं गेलों होतों व त्या सुमारास जसें जमशेदपूर त्याप्रमाणें किर्लोस्करवाडी, असा लेख मी केसरींत लिहिला होता. १९१८–१९ सालीं श्री. शंतनूराव न्यू–स्कूलमध्यें असतांना हस्तव्यवसाय शिक्षणाचे वर्गास रमणबागेंत येत असत. तेव्हां आगगाडीचा डबा करण्याबद्दल त्यांना एक बक्षीस मिळाल्याचें मला आठवलें व मुद्दाम ही गोष्ट मी लक्ष्मणरावांना कळविली असावी. त्यावेळीं मी रमणबागेंतील हस्तव्यवसाय वर्गावर शिक्षक होतों. किर्लोस्करवाडीस गेलों असतांना 'आयर्न एज' सारखी नामांकित नियतकालिकें मी पाहिलीं होतीं आणि असें वाङ्मय जमा करण्यास टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्थापत्य शाखेचें काम मजकडे असतांना मला बराच वाव मिळाला. मजकडे मोठ्या प्रमाणावर मेल येऊं लागली. कांहीं समान व्यवसायबंधूंना त्याची किंमत कळत नसे. १९२२–२३ च्या सुमारास लक्ष्मणराव टिळक महाविद्यालय पहावयास आले होते. तेव्हां त्यांनीं भाऊमहाराज बागेंतील विहिरीवर बसवावयासाठीं एक त्यांच्या कारखान्यांत तयार होणारा पंप दिला. या ठिकाणच्या उद्योगभवनांत येणारें परदेशचें वाङ्मय पाहून ते खुष झाले आणि मला त्यांनीं सांगितलें कीं परदेशी कॅटलॉग वाचून मी शहाणा झालों; त्यांचा उपयोग फार आहे.

तेव्हांपासून परदेशी नियतकालिकें व कॅटलॉग जमविण्याचा माझा उद्योग सतत चालू आहे आणि आज अशा साहित्याचें मोठें वाचनालय होऊन राहिलें आहे. अशा व्यापार–उद्योगधंदेविषयक वाङ्मयाचीं व कॅटलॉगचीं स्वतंत्र वाचनालयें परदेशांतून आहेत व त्यांचा उपयोग व्यापार–उद्योगधंद्याचे वाढीस होत असतो. पुढें श्री. बा. गं. खेर यांचें लक्ष पुणें येथील महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयांत असलेल्या वाचनालयाकडे गेलें व त्या विभागास आतां स्वतंत्र देणगीहि मिळूं लागली आहे व नित्यशः मिळणाऱ्या साहित्याचें भाण्डार सतत समृद्ध होत आहे. याचा उपयोग करणारांची संख्याहि थोडी, थोडी वाढत आहे.

लक्ष्मणरावांच्या सत्कारापासून आमची होतकरू तरुण पिढी अशा साहित्याचा उपयोग करावयास शिकेल, तर त्यांतून देशहित साधेल.

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें } मा. वि. घारपुरे

---

सातारा जिल्हा को–ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि., कराड व सांगली.

## भागीदारांस नोटीस

बँकेच्या भागीदारांची १७ वी वार्षिक साधारण सभा शनिवार ता. २६ सप्टेंबर १९५३ रोजीं दुपारीं ३ वाजतां कराड येथें बँकेच्या ऑफिसमध्यें भरणार आहे. या सभेंत सन १९५२–५३ चा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक, १९५३–५४ सालचें बजेट, डायरेक्टरबोर्डाची निवडणूक, पोटनियम दुरुस्ती, ऑडिटरची नेमणूक वगैरे विषयांचा विचार करणें इ. कामें होतील. तरी बँकेच्या सभासदांनीं येण्याचें करावें, अशी विनंति आहे.

कराड ता. ३।९।५३ } आण्णापा नारायण कल्याणी, चेअरमन.

पूर्व खानदेश सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. जळगांव.

## नोटीस.

नोटीस देण्यांत येतें कीं, भागिदारांची वार्षिक साधारण सभा बुधवार तारीख ३० सप्टेंबर १९५३ रोजीं जळगांव येथें सकाळीं ८-३० ते ११ व दुपारीं १ वाजल्यापासून पुढें नटवर थिएटर-मध्यें भरेल व त्यांत पुढील कामें होतील.

१. श्री. चेअरमन साहेब यांचें प्रास्तविक भाषण.

२. सन १९५२-५३ सालचा आहवाल, ताळेबंद व हिशेब मंजूर करणें.

३. भागावरील नफा (डिव्हिडंड) किती द्यावयाचा तें ठरविणें व सन १९५२-५३ सालचे नफ्याची वांटणी मंजूर करणें.

४. लोकल ऑडिटर व सरकारी ऑडिटर यांचे ऑडिटमेमोचा विचार करणें.

५. नियमाप्रमाणें डायरेक्टर्सच्या चार जागा रिकाम्या होतील, त्या जागीं नवीन डायरेक्टर्स निवडणें, सोसायट्यांतर्फे दोन श्री. सोनुसिंग धनसिंग पाटील, श्री. किसनराव दाजी पाटील, अर्बन बँक वगैरे तर्फे श्री. कन्हैयालाल सखाराम लाबोया आणि व्यक्तिशः भागीदारांतर्फे श्री. दीपचंद चुनिलाल सावद्रा हे डायरेक्टर्स निवृत्त होतील व ते पुन्हां निवडून येण्यास पात्र राहातील.

६. १९५३-५४ सालाकरतां चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडणें.

७. सोबत दाखल केल्याप्रमाणें पोटनियम-दुरुस्त्याबद्दल विचार करणें.

८. पोटनियमाप्रमाणें कर्ज उभारण्याची मर्यादा ठरविणें.

९. श्री. चेअरमनसाहेब यांचे अगाऊ परवानगीनें आयत्या-वेळीं पुढें येणाऱ्या विषयांचा विचार करणें.

टीप:—बँकेस जोडलेल्या प्रत्येक सोसायटीस वरील सभेकरितां फक्त एक प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क आहे. मात्र सदर प्रतिनिधीकडे सोसायटीचें तहकुबी न मिळालेले थकबाकीचें कर्ज येणें नसलें पाहिजे व त्याबद्दल असें कर्ज येणें नाहीं, असा त्यांनीं सोसायटीकडून दाखला आणला पाहिजे. अशा प्रतिनिधींनीं यासोबतचा प्रतिनिधी दाखला ठरावाचे नकलेसह त्या सोसायटीचें चेअरमन व सेक्रेटरी यांच्या दोघांच्याही सह्या घेऊन बरोबर आणावा. अशा प्रतिनिधीदाखल्याशिवाय त्यास प्रतिनिधी समजण्यांत येणार नाहीं.

तरी याप्रमाणें ज्या सोसायट्यांस प्रतिनिधी पाठवावयाचे असतील त्यांनीं त्यांची निवड करून आम्हांस नांवें सदर बाबतींत पंचकमिटीचे ठरावाचे नकलेसह अगाऊ कळवावीत. सदर प्रतिनिधी व भागीदारांनीं सभेस हजर रहावें अशी विनंती आहे.

सभेच्या दिवशीं सकाळीं ९ ते १० वाजण्याचें वेळांत डायरेक्टर्सचे जागेसाठी उमेदवारांचीं नांवें नोंदण्यांत येतील व मतनोंदणीस दुपारीं सुरवात होईल.

सूचना:—तारीख २२ सप्टेंबर १९५३ पर्यंत आमचे जळगांव ऑफिसांत कळविण्यांत आलेल्या विषयांचीच मात्र माहिती सभेच्या वेळीं विचारतां येईल.

जळगांव
ता. २२-८-१९५३

खुलालसिंग शंकरराव पाटील
चेअरमन.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

**शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. कृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३९१-९२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर



# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१, ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२, तारेचा पत्ता : फार्मर्सबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | |
| भागीदारांतर्फे | रु. ३३,९९,१५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० |
| | रु. ४९,९९,१५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५४,३३,९०० |
| ठेवी | रु. ९,२५,२६,५०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,२९,०२,८०० |

**१६ जिल्ह्यामध्यें ६७ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पु. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

इं. फि. कॉर्पोरेशनला ३० जून, १९५३ असेर संपलेल्या वर्षी २३,१६,६९१ रु. नफा झाला. ९,४१,६९१ रु. कराची तरतूद करून व २,५०,००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून ११,२५,००० रु. चा विनियोग २½% डिव्हिडंड देण्याकडे केला जाईल. ५ कोटी रु. च्या वसूल भांडवलावरील हमीचें डिव्हिडंड देण्यास पुरेसा नफा झाल्यामुळें, सरकारकडे त्यासाठी रक्कम मागावी लागणार नाहीं.

इं. फि. कॉर्पोरेशनच्या भागीदारांचें वर्गीकरण खालीलप्रमाणें आहे:—

| | भागांची संख्या |
|---|---|
| मध्यवर्ती सरकार | २,००० |
| रिझर्व्ह बँक | २,०५४ |
| शेड्यूल्ड बँका | २,४३० |
| विमा, ट्रस्ट कंपन्या | २,५७३ |
| सहकारी बँका | ९४३ |

इं. फि. कॉर्पोरेशनला स्वतःच्या कर्जाऊ रकमांवर जास्त दरानें व्याज द्यावें लागल्यामुळें तिच्या कर्जदारांच्या कर्जावरील व्याजाचा दरहि वाढवावा लागला. तो आतां ६½% असून ठरल्याप्रमाणें व्याज व हप्ते दिल्यास ½% रिबेट दिला जातो.

कॉर्पोरेशनच्या स्थापनेपासून ३० जून, १९५३ असेर कॉर्पोरेशननें १५,४६,७०,००० रु. चीं कर्जें मंजूर केलीं. परंतु, बदललेल्या आर्थिक परिस्थितीमुळें गेल्या पांच वर्षांत, कित्येक कंपन्यांनीं मंजूर कर्जें घेतलींच नाहींत.

बहुतेक कर्जदार कंपन्या व्याज व हप्ते वक्तशीर देत आहेत, परंतु कांहीं कंपन्यांना मुदत वाढवून द्यावी लागली.

इं. फि. कॉर्पोरेशननें ३० जून, १९५३ पर्यंत मंजूर केलेल्या कर्जांची राज्यवार वांटणी खाली दिली आहे.

| राज्य | कर्जदार कारखान्यांची संख्या | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| आसाम | ० | ० |
| मुंबई | २७ | ४,२७,५०,००० |
| बिहार | ५ | ८३,००,००० |
| मध्यप्रदेश | ३ | ३९,७५,००० |
| पंजाब | ४ | २७,५०,००० |
| मद्रास | ६ | १,२६,५०,००० |
| ओरिसा | २ | ५९,००,००० |
| उत्तरप्रदेश | ७ | ५४,७०,००० |
| प. बंगाल | १७ | ३,०१,७५,००० |
| राजस्थान | २ | ६०,००,००० |
| सौराष्ट्र | ३ | १,४०,००,००० |
| मध्यभारत | १ | ३,५०,००० |
| त्रावणकोर कोचीन | ३ | ६५,५०,००० |
| म्हैसूर | ७ | ९८,००,००० |
| हैद्राबाद | २ | ६०,००,००० |
| एकण | ८९ | १५,४६,७०,००० |

### कॉर्पोरेशननें मंजूर केलेलीं कर्जें—उद्योगवार वांटणी

| उद्योगाचा प्रकार | ३० जून १९५३ असेरच्या वर्षी मंजूर केलेलीं कर्जें (रु.) | ३० जून १९५२ असेर मंजूर केलेलीं कर्जें (रु.) | एकूण (रु.) |
|---|---|---|---|
| टेक्स्टाइल मशिनरी ... | — | ६४,००,००० | ६४,००,००० |
| मॅकॅनिकल इंजिनिअरिंग ... | ५,००,००० | ६८,००,००० | ७३,००,००० |
| इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग ... | १२,००,००० | १,१४,५०,००० | १,२६,५०,००० |
| कॉटन टेक्स्टाइल्स ... | ६५,००,००० | २,०४,७५,००० | २,६९,७५,००० |
| वूलन टेक्स्टाइल्स ... | — | ३५,००,००० | ३५,००,००० |
| रेयॉन टेक्स्टाइल्स ... | — | ५०,००,००० | ५०,००,००० |
| केमिकल्स ... | ११,७५,००० | १,८६,००,००० | १,९७,७५,००० |
| सिमेंट ... | — | ९०,००,००० | ९०,००,००० |
| सिरॅमिक्स व कांच ... | — | १,१९,००,००० | १,१९,००,००० |
| ऑइल मिल्स ... | ३,५०,००० | २,५०,००० | ६,००,००० |
| वीज ... | २५,००,००० | १७,५०,००० | ४२,५०,००० |
| मेटॅलर्जिकल उद्योग ... | — | ३५,००,००० | ३५,००,००० |
| लोखंड-पोलाद ... | १७,५०,००० | ५०,५०,००० | ६८,००,००० |
| अल्युमिनिअम ... | — | ५०,००,००० | ५०,००,००० |
| साखर ... | — | १,१५,००,९०० | १,१५,००,००० |
| खाणी ... | — | ३० ००,००० | ३०,००,००० |
| कागद ... | — | ७४,००,००० | ७४,००,००० |
| मोटारी, ट्रॅक्टर ... | — | ५०,००,००० | ५०,००,००० |
| इतर ... | ३,५०,००० | ४७,७०,००० | ५१,२०,००० |
| | १,४३,२५,००० | १४,०३,४५,००० | १५,४६,७०,००० |

### बंगलोर येथील रेडिओचा कारखाना

बंगलोर येथील रेडिओ अँड इलेक्ट्रिकल मॅन्युफॅक्चरिंग कंपनीला (रेमको) भारताचे संरक्षणमंत्री श्री. त्यागी आणि म्हैसूरचे मुख्य प्रधान श्री. हनुमंतय्या ह्यांनीं नुकतीच भेट दिली. भारत सरकार बंगलोर येथें भारत इलेक्ट्रॉनिक्स ह्या नांवाचा एक कारखाना काढणार आहे. ह्या संकल्पित कारखान्याचे रेमकोशीं सहकार्य होणें कितपत शक्य आहे तें अजमावण्याचा हेतु वरील भेटीमागें होता. रेमको कंपनीला तेथील जनरल इलेक्ट्रिक कंपनीचें सहकार्य लाभलें असल्यामुळें ती आतां रेडिओ आणि त्याला लागणारे सुटे भाग यशस्वी रीत्या तयार करूं लागली आहे. जपानमधील शिआबुरा इलेक्ट्रिक कंपनीच्या मदतीनें घरांतील विजेचा खप दर्शविणारे मीटर्सहि कंपनी करूं लागली आहे. शिवाय, विजेच्या निरनिराळ्या प्रकारच्या ताराहि कंपनी करूं लागली आहे. रेमको कंपनीचे मुख्य इलेक्ट्रिकल एंजिनिअर श्री. चांदी ह्यांचें असें म्हणणें आहे कीं कंपनीजवळ जरूर ती यंत्रसामुग्री, तंत्रज्ञ आणि अनुभव आहे. गेलीं पांच वर्षें ही कंपनी रेडिओ तयार करीत असून ती म्हैसूर सरकारच्या मालकीची आहे. तेव्हां भारत सरकारनें ह्याच कंपनीला आपल्या नव्या कारखान्याचें प्राथमिक केंद्र म्हणून मानावें. तसें न करतां आलें तर रेमको कंपनीचा उपयोग राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें करण्यांत यावा आणि संकल्पित नव्या कारखान्याला लागणारें जें साहित्य रेमकोमध्यें तयार होण्यासारखें असेल तें त्याच कारखान्याकडून घ्यावें. असें केल्यानें कारखान्याचा उपयोग केल्यासारखें होऊन शिवाय तेंच तेंच काम दोन ठिकाणीं करण्याचा प्रसंगहि टळेल.


॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

" Sound And Constructive Reasoning
Shows the Right Path " विष्णु तीर्थ

साखरेचें वार्षिक उत्पादन कायमचें वाढविलें
हाच शेअर व ठेवीच्या सुरक्षितपणाचा उजू मार्ग

—: साखर विक्रीच्या रकमेंतून :—

★ (१) बँकांचे (१०) दहा लक्ष रुपयांचें कॅश क्रेडिट परत केलें.
★ (२) ठेवीदारांच्या व्याजासह WITH THANKS
(३६) छत्तीस लक्ष रुपयांच्या ठेवी परत केल्या.

**कोणाहि ठेवीदाराची ठेव बुडाली नाहीं.**

येत्या हंगामाच्या साखरविक्रींतून
ठेवीचा बोजा आणखी कमी केला जाईल.
भागीदारांना शेअरवर डिव्हिडंड मिळेल.

— साखर–विक्रीवर सरकारी नियंत्रण असेपर्यंत —:
बँका किंवा ठेवीदार यांच्याकडून रोख रक्कम घ्यावी लागते

ठेवींच्या व्याजाचे दर
★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ ( सात ) टक्के.
★ मुदत एक वर्ष — व्याज ६ ( सहा ) टक्के.

ठेवींचे व शेअरचे फॉर्म पुणें येथील मुख्य कचेरींत मिळूं शकतील.

९८० सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. २७ऑगस्ट १९५३.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे अँण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स्.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.